

# नागरीकशास्त्र लेख-2

**राहुल परब, शाळा :** महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पू)

## केंद्रीय कार्यकारी मंडळ

केंद्रीय कायदेमंडळाविषयी माहिती मिळाल्यानंतर केंद्रीय कार्यकारी मंडळाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. केंद्रीय कायदेमंडळात राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. संसदेने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करते. सर्वप्रथम आपण कार्यकारी मंडळात राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांचा विचार करू.

### राष्ट्रपती

● राष्ट्रपती हे देशाचे घटनात्मक प्रमुख असतात. राष्ट्रपती देशाचा पहिला नागरिक आणि राज्यप्रमुख मानला जातो. राष्ट्रपती हे अतिशय सन्मानाचे व प्रतिष्ठेचे पद आहे ● **निवड** संसदेचे निर्वाचित सदस्य व राज्यांच्या विधानसभांतील निर्वाचित सदस्य यांच्यामार्फत राष्ट्रपती निवडले जातात. ● **पात्रता** ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी. तिचे वय ३५ वर्षे असावे. लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास ती व्यक्ती पात्र असावी. ● **कार्यकाल** राष्ट्रपतींचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो.तत्पूर्वी ते पदाचा राजीनामा देऊ शकतात. ● **पदच्युती** महाभियोग पद्धतीचा अवलंब करून राष्ट्रपतींना पदावरून दूर करता येते. घटनेचा भंग राष्ट्रपतींकडून झाल्यास संसद त्यांना पदावरून दूर करू शकते. महाभियोगासंबंधीचा प्रस्ताव संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात मांडता येतो व दुसरे सभागृह आरोपांची छाननी करते. दोन्ही सभागृहांनी महाभियोगाचा प्रस्ताव विशेष बहुमताने मंजूर केल्यास राष्ट्रपतींना आपले पद सोडावे लागते.

### उपराष्ट्रपती

● उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. राज्यसभेचे सर्व कामकाज उपराष्ट्रपतींच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनानुसार चालते.राष्ट्रपतीपद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळतात. ● **निवड** संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या निर्वाचित सदस्यांकडून उपराष्ट्रपतींची निवड केली जाते. ● **पात्रता** ती व्यक्ती भारतीय नागरिक असावे तिचे वय ३५ वर्षे असावे. राज्यसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास ती व्यक्ती पात्र असावी. ● **कार्यकाल** उपराष्ट्रपतींचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो.तत्पूर्वी ते पदाचा राजीनामा देऊ शकतात. ● **पदच्युती** राज्यसभेने बहुमताने ठराव संमत केल्यास लोकसभेच्या संमतीने उपराष्ट्रपतींना त्यांच्या पदावरून दूर करता येते.

### राष्ट्रपतींचे अधिकार

- कार्यकारी अधिकार
- कायदेविषयक अधिकार
- न्यायविषयक अधिकार
- आर्थिक अधिकार
- आणीबाणीविषयक अधिकार

★ **कार्यकारी अधिकार-**राष्ट्रपती केंद्रशासनाचे कार्यकारी प्रमुख असतात. केंद्र शासनाचा कारभार त्यांच्या नावे चालतो.देशाच्या राज्यकारभाराची तसेच मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांची पंतप्रधानांकडून माहिती मिळविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.राष्ट्रपती हे पंतप्रधान व मंत्रिमंडळातील मंत्री, घटक राज्यांचे राज्यपाल, महान्यायवादी,नियंत्रक व महालेखापाल,मुख्य निवडणूक आयुक्त अशा केंद्र शासनाच्या सर्व महत्त्वाच्या नेमणुका करतात. भारताचे राज़दूत व राजनैतिक अधिकारीयांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात.अन्य देशांचे भारतातील राजदूत व राजनैतिक अधिकाऱ्यांना राष्ट्रपती मान्यता व स्वीकृती देतात.राष्ट्रपती तिन्ही संरक्षण दलांचे सरसेनापती असतात.

★ **कायदेविषयक अधिकार-**संसदेचे अधिवेशन बोलाविण्याचा व स्थगित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार लोकसभा विसर्जितकरण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक राष्ट्रपती आमंत्रित करतात.लोकसभेचे अधिवेशन राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने सुरू होते. राष्ट्रपतींना राज्यसभेवर १२ सदस्य तर ॲग्लोइंडियन जमातीतील २ सदस्य लोकसभेवर नेमण्याचा अधिकार असतो.कोणतेही विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कायद्यात रूपांतरित होत नाही.संसदेचे अधिवेशन सुरू नसताना कायद्याची आवश्यकता असल्यास राष्ट्रपती तसा अध्यादेश काढतात.

★ **न्यायविषयक अधिकार-**राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश व अन्य न्यायाधीशांच्या नेमणुका करतात.संसदेने संमत केलेल्या ठरावावरून सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.दयेचा अर्ज केलेल्या व्यक्तीला दया दाखविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

★ **आर्थिक अधिकार-**अर्थविधेयक राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीनेच लोकसभेत सादर केले जाते.राष्ट्रपतींना दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमण्याचा अधिकार असतो.

★ **आणीबाणीविषयक अधिकार-**देशापुढील संकटांचा सामना करण्यासाठी राष्ट्रपतींना तीन प्रकारची आणीबाणी घोषित करता येते.देशाची सुरक्षितता आणि अखंडता युद्धामुळे परकीय आक्रमणामुळे किंवा अंतर्गत सशस्त्र उठावामुळे धोक्यात आली आहे, असे वाटल्यास राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करतात. एखाद्या घटक राज्यात अस्थैर्य व गोंधळाची परिस्थिती उद्‌भवल्यास त्या राज्यात आणीबाणी लागू करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. याला घटकराज्यआणीबाणी किंवा राष्ट्रपती राजवट म्हणतात.देशाचे आर्थिक स्थैर्य किंवा पत धोक्यात आले आहे, असे राष्ट्रपतींना वाटल्यास ते आर्थिक आणीबाणी घोषित करतात. राष्ट्रपतींनी केलेल्या आणीबाणीच्या घोषणेस संसदेची मान्यता घेणे आवश्यक असते.

★ **मंत्रिमंडळ** देशाच्या कारभारात राष्ट्रपतींना मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ असते.राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करतात व पंतप्रधान स्वत:चे मंत्रिमंडळ तयार करतात.मंत्री संसदेचा सदस्य असावा अन्यथा नेमणुकीनंतर सहा महिन्यांत त्याला सदस्य म्हणून निवडून यावे लागते.मंत्रिमंडळ संयुक्तरित्या लोकसभेला जबाबदार असते. लोकसभेचा विश्वास आणि पाठिंबा असेपर्यंतच ते अधिकारावर राहते.मंत्रिमंडळात कॅबिनेट दर्जाचे मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री असे तीन प्रकारचे मंत्री असतात.

★ **मंत्रिमंडळाची कार्ये व अधिकार ● विधेयक निर्मितीत पुढाकार-**विधेयकाचे प्रस्ताव तयार करणे व संसदेच्या सभागृहात ते मांडणे यात मंत्रिमंडळ पुढाकार घेते. सभागृहामध्ये सादर होणारी बहुसंख्य विधेयके मंत्रिमंडळाने तयार केलेली असतात.**आर्थिक प्रशासनावर नियंत्रण** देशाच्या आर्थिक प्रशासनावर मंत्रिमंडळाचे संपूर्ण नियंत्रण असते.कर, कर्ज आणि खर्च याबाबतचे सर्व निर्णय मंत्रिमंडळ घेत असते.अर्थमंत्री केंद्र शासनाचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना मंत्रिमंडळाशी विचारविनिमय करतात. **सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी** मंत्रिमंडळ सार्वजनिक धोरण आखण्याचे काम करते.सार्वजनिक धोरणाची अंमलबजावणी सनदी सेवकांचा वर्ग मंत्र्यांच्या मार्गदर्शनानुसार करतो.

★ **परराष्ट्र धोरणाची निर्मिती** देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत मंत्रिमंडळाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते.परराष्ट्राशी तह आणि करार करण्याचा अधिकार मंत्रिमंडळास असतो. हे करार राष्ट्रपतींच्या नावे व संसदेच्या संमतीने होत असले तरी कराराचे विषय व आशय ठरविण्याचा अंतिम अधिकार मंत्रिमंडळालाच असतो.

★ **पंतप्रधान** केंद्र शासनात पंतप्रधानपद अत्यंत प्रबळ आणि महत्त्वाचे असते.पंतप्रधान म्हणजे अनेक भूमिका पार पाडणारी एक व्यक्ती असते. पंतप्रधान मंत्रिमंडळाचे प्रमुख असल्याने त्यांचा राजीनामा संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा मानला जातो.

**पंतप्रधानाची कार्ये -मंत्रिमंडळाची निर्मिती-**पंतप्रधान मंत्रिमंडळातील मंत्र्यांची निवड, मंत्र्यांमध्ये खातेवाटप करणे इ. महत्त्वाची कार्ये करतात.शासनाच्या धोरणामध्ये समन्वय राखण्याची जबाबदारी पंतप्रधानांवर असते.पंतप्रधान मंत्रिमंडळाच्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवितात. पंतप्रधानांच्या सूचना व मतांना विशेष महत्त्व असते.

**मंत्रिमंडळ व राष्ट्रपती यामधील दुवा** पंतप्रधान मंत्रिमंडळाचे सर्व निर्णय राष्ट्रपतींना कळविण्याची जबाबदारी पार पाडतात.पंतप्रधानांना डावलून मंत्र्यांनी राष्ट्रपतींना स्वतंत्रपणे भेटणे अयोग्य मानले जाते.**लोकसभेचे नेतृत्व** पंतप्रधान लोकसभेचे नेते असतात. त्यांना मंत्रिमंडळात एकजिनसीपणा व संघवृत्ती निर्माण करावी लागते.संसदेत चालणाऱ्या चर्चेत योग्य वेळी हस्तक्षेप करून शासनाची बाजू पंतप्रधानांना मांडता येते.

**परराष्ट्र धोरणाचे मुख्य प्रवक्ते** पंतप्रधान हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य प्रवक्ते असतात.परराष्ट्र धोरणाबाबत पंतप्रधानांचे वक्तव्य अधिकृत मानले जाते व ते गंभीरपणे घेतले जाते.आंतरराष्ट्रीय राजकारणाशी संबंधित पंतप्रधानांनी घेतलेल्या निर्णयानुसार जागतिक राजकारणात भारताची प्रतिमा तयार होत असते.

**नोकरशाही** शासनाची धोरणे प्रत्यक्ष व्यवहारात अमलात आणणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेस नोकरशाही म्हणतात. नोकरशाहीतील सनदी सेवक केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांमधून निवडले जातात. नोकरशाहीमुळे शासनाच्या कार्याला स्थैर्य आणि सातत्य लाभते. सनदी सेवकांनी नि:पक्षपाती वृत्तीने सामाजिक न्याय व समता यामूल्यांशी बांधिलकी राखून कार्य करावे.

**उद्याचा विषय :** भूगोल-अर्थशास्त्र

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2008@gmail.com

